**तात्काळ/कालमर्यादा/महत्त्वाचे**

क्रमांक -पोमसं/३१/३९-३/मोसाअ (२०२२-२३)/२०२/२०२२ मुंबई, दि.२४/०२/२०२३

**विषय :- लेखा अनुदान २०२२ - २३**
मागणी क्र.बी-११, मुख्यलेखाशिर्ष- "७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे" गौणशिर्ष-२०२, मोटार वाहन अग्रिमाबाबत.

*********

## आदेश

शासन निर्णय ,गृह विभाग क्र.बीयुडी- ०६२२/प्र.क्र.१११/आस्था-१, दि.१३/०१/२०२३ अन्वये सन २०२२-२३ या वित्तिय वर्षासाठी पोलीस दलातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना मोटार-वाहन अग्रिमाचे वाटप करण्याकरिता रु.६३,००,०००/- (अक्षरी त्रेसष्ट लाख फक्त) एवढा निधी शासनाने मागणी क्र.बी - ११ मुख्यलेखाशिर्ष " ७६१०- शासकीय कर्मचारी इ.कर्जे " मधील गौणशिर्ष २०२- मोटार वाहन अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०१८५१) योजनेअतर्गत चिन्हांकित करुन दिला आहे. त्यापैकी शिल्लक निधीमधील या कार्यालयाच्या अधिपत्याखालील घटक कार्यालयांना त्यांच्या अधिनस्थ ९० अधिकारी/ कर्मचाऱ्यांना मोटार वाहन अग्रिमाकरीता एकूण रु.६३,००,०००/- (अक्षरी रु.त्रेसष्ट लाख फक्त) इतका निधी **संबंधित विभाग प्रमुख/ प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांचे आस्थापनेवरील संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांना मोटार वाहन अग्रिम वाटप करण्याकरिता बी.डी.एस. प्रणालीवर सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.**

२. सदर शासन निर्णयानुसार शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या रु.६३,००,०००/- (अक्षरी रु.त्रेसष्ट लाख फक्त) एवढ्या निधीचे संबंधित कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांना, शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अग्रिम-२०१३/ प्र.क्र.१०/२०१३ विनियम दि.२०/०८/२०१४ अन्वये मूळ वेतनाच्या ९ पट एवढी रक्कम किंवा अनुक्रमे रु.७०,०००/- (मोटार सायकल करिता) / रु.६०,०००/- (स्कूटर करिता) किंवा मोटार सायकल/स्कूटरची किंमत या पैकी कमीत कमी रकमचे मोटार सायकल/स्कूटर अग्रिमाकरिता वाटप करावे.

३. सोबतच्या विवरणपत्रातील रकाना क्र.३ मध्ये नमुद विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे त्यांच्या अधिपत्याखालील संबंधित अधिकारी /कर्मचाऱ्यांना शासन निर्णय वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, दिनांक १७/०४/२०१५ अन्वये मुंबई वित्तिय नियम १९५९ मधील तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या वित्तिय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उप विभाग-एक, मधील अनुक्रमांक १२ नियम १३६,१३७ व १३९ अन्वये मोटार वाहन अग्रिम मंजूरीचे आदेश निर्गमित करावेत.

४. **विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना सूचित करण्यात येते की, म.शा.वि.वि. क्र. अग्रिम-२०१३/प्र.क्र.१०/ २०१३/ विनियम, दि.२०/०८/२०१४ आणि शासन निर्णय वित्त विभाग क्र.अग्रिम २०११ /प्र.क्र.५७ /२०११ / विनिमय दि.१७/०२/२०१२ अन्वये विहित केलेल्या अटी व शर्तीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदर दि.२०/०२/२०१४ च्या शासन निर्णयातील अट क्र. २ (९) नुसार मोटार सायकल/ स्कूटरसाठी आणि शासन निर्णय क्र.अग्रिम २०११/प्र.क्र.५७/२०११/विनियम, दि.१७/०२/२०१२ नुसार मोटार कारसाठी अग्रिमाचा मंजुरी आदेश निर्गमित करताना त्यामध्ये सदर शासन निर्णयातील खालील अटी शर्तीचा उल्लेख करावा :-**

१) शासन निर्णयातील विहीत तरतुदीनुसार मोटार वाहन खरेदीबाबत आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे मोटार वाहन अग्रिम प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत संबंधीत कर्मचाऱ्यांनी सादर करावीत. तसे न केल्यास अग्रिम धारकाकडून अग्रिमाची संपुर्ण रक्कम १ महिन्यानंतर दंडनीय व्याजासह एक रकमी वसूल करण्यात येईल.

२) मोटार वाहनाच्या मॉडेलचे नाव, उत्पादनाचे वर्ष, खरेदीची तारीख व त्या संदर्भाचे नोंदणीचे कागदपत्र सादर करावी लागतील.

३) मोटार कार, मोटार सायकल, स्कूटर, मोपेड, सायकल व अपंग राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी स्वयंचलीत तीन चाकी सायकल, स्कूटर विथ ॲडप्शन व मोपेड यांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविण्यात यावा व तो सतत चालू राहील याची दक्षता घेणे आवश्यक राहील.

४) वाहन अग्रिम रकमेच्या नियमित वसुलीसाठी तसेच मंजूर अग्रिम रकमेपेक्षा कमी किंवा जादा वसुली होत असल्यास त्यास अर्जदार स्वत:ही जबाबदार राहील.

५) अग्रिमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासुन दूर राहिला तरीही वाहन अग्रिम तसेच शासनाकडील इतर अन्य अग्रिमांची नियमित परतफेड करण्यास संबंधित अग्रिमधारक स्वत: जबाबदार राहील.

५. अग्रिम मंजूर करताना मुंबई वित्तीय नियम-१९५९ मधील नियम १२४(बी) व वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अग्रिम-१०९५/ प्र.क्र.७०/ ९५/ विनियम, दि. २६/०९/१९९७ मध्ये नमूद तसेच, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार लागू ठरणाऱ्या दंडनीय व्याजाचा उल्लेख मंजूरीच्या आदेशात करण्यात यावा.

६.     शासनाने, सदर शासन निर्णयान्वये चिन्हांकित करुन दिलेल्या निधीचा विनियोग दि. ३१/०३/२०२३ पर्यंत होणे आवश्यक आहे. सर्व घटक प्रमुखांना निर्देशित करण्यात येते की, देयके दि.३१/०३/२०२३ पूर्वी कोषागारात सादर करुन ती पारीत करुन घ्यावीत. तसेच अग्रिमाची रक्कम ज्या महिन्यात वितरीत केली असेल त्याच्या पुढील महिन्यापासून अग्रिमाच्या वसूलीस सुरुवात करावी.

७.     सदर निधीचा विनियोग पुर्णत: न केल्यास किंवा तो व्यपगत झाल्यास त्याची सविस्तर कारणे शासनास व लोकलेखा समितीस सादर करावी लागतात. तरी निर्देश देण्यात येत आहेत की, विभाग प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांचे मोटार वाहन अग्रिम मंजूरी संबंधीचे आदेश त्वरीत निर्गमित करावेत. आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित कोषागार कार्यालयास त्यासंबंधीची देयके सादर करुन सदरची देयके कोणत्याही परिस्थितीत दि.३१/०३/२०२३ पूर्वी पारित करुन घ्यावीत. तसेच संबंधीत अधिकारी / कर्मचाऱ्याला अग्रिम रक्कम अदा करणे ही सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित घटक प्रमुखांची असल्यामुळे त्यांनी सदर प्रकरणांची तातडी व गांभीर्य लक्षात घेऊन व या प्रकरणी वैयक्तीकरित्या लक्ष देऊन त्यांचे कार्यालयातील लेखा विषयक कामकाज हाताळणारे लेखा अधिकारी/ सहाय्यक लेखा अधिकारी /लिपिक वर्गीय अधिकारी /कर्मचारी यांनी स्वत: लक्ष देऊन त्याप्रमाणे विहीत कालावधीत अचूक व परिपूर्ण कामे करण्याबाबत सक्त सूचना द्याव्यात. संबंधीतांना अग्रिम रक्कम अदा केल्यानंतर त्याची दिनांकित अदारोल पावती, देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक त्यांचे सेवापुस्तकात/ सेवापटात नोंद करावा आणि या कार्यालयास /शासनास व महालेखापाल-१,मुंबई /महालेखापाल-२, नागपूर/अधिदान व लेखा कार्यालय मुंबई यांना **दि.३०/०४/२०२३** पूर्वी न चुकता तसा अहवाल सादर करावा.

८.     असे निर्देश देण्यात येत आहेत की, उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेच्या खर्चाचा ताळमेळ महालेखापाल यांचे कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी/ महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण-१४ नियम १५७ च्या परिशिष्ट ३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहित मुदतीत पाठविण्यात यावी व त्यानुसार या कार्यालयाने मंजूर केलेल्या अग्रिमाच्या खर्च मेळयाची प्रमाणित माहिती दि.३०/०४/२०२३ पूर्वी महालेखापाल यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

९.     तसेच खर्चमेळ्याची माहिती महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारीही क्षेत्रीय विभागीय कार्यालय प्रमुखांची राहील व त्याप्रमाणे माहिती न पाठविणाऱ्या कार्यालयातील संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करणे भाग पडेल याची कृपया नोंद घ्यावी. प्रमाणित न केलेली माहिती स्वीकारण्यात येणार नाही. या कारणामुळे विलंब झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग/कार्यालय प्रमुखांची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

१०.     सदरचा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील गृह विभाग मागणी क्र.बी - ११ मुख्यलेखाशिर्ष " ७६१०- शासकीय कर्मचारी इ.कर्जे " मधील गौणशिर्ष २०२ - मोटार वाहन अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०००९६) अन्वये खर्ची टाकण्यात यावा व वित्तीय वर्ष २०२२-२३ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सदरचा खर्च याच लेखाशिर्षाखाली नोंदविला गेला आहे किंवा नाही याची खातरजमा न विसरता करावी याचीही कृपया नोंद घ्यावी.

**(अनुप कुमार सिंह)**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, म.राज्य, मुंबई

प्रति,

पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण व परिवहन, पुणे
पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर/ लोहमार्ग मुंबई/ नागपूर शहर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर / नाशिक परिक्षेत्र
पोलीस अधीक्षक, यवतमाळ/ठाणे ग्रा./सोलापूर ग्रा./बुलडाणा/औरंगाबाद ग्रा./गडचिरोली/हिंगोली/लोहमार्ग औरंगाबाद
समादेशक, रारापोबल, गट क्र.१ पुणे /८ मुंबई / ९ अमरावती/ १२ हिंगोली /१४ औरंगाबाद
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली कॅम्प, नागपूर

प्रत सादर - महालेखापाल - १ मुंबई / महालेखाकार - २, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई "७६१०-शासकीय कर्मचारी इ. ना कर्जे " वित्तीय वर्ष २०२२-२३ मागणी क्र.बी-११ गौणशिर्ष २०२- मोटार वाहन अग्रिम**

| अ.क्र. | घटक कार्यालयाचे नाव | विभाग प्रमुख | अर्जांची संख्या | वाटप अनुदान |
|---|---|---|---|---|
| १ | पोलीस अधीक्षक, यवतमाळ | पोलीस अधीक्षक, यवतमाळ | ७ | ४९०००० |
| २ | पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण | पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण | १ | ७०००० |
| ३ | समादेशक, रारापोबल गट क्र. १ पुणे | समादेशक, रारापोबल गट क्र.१ पुणे | २ | १४०००० |
| ४ | पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण व परिवहन,पुणे | पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण व परिवहन,पुणे | ३ | २१०००० |
| ५ | पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रा. | पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रा. | १ | ७०००० |
| ६ | पोलीस अधीक्षक, बुलडाणा | पोलीस अधीक्षक, बुलडाणा | १५ | १०५०००० |
| ७ | समादेशक, रारापोबल गट क्र.१४ औरंगाबाद | समादेशक, रारापोबल गट क्र.१४ औरंगाबाद | १५ | १०५०००० |
| ८ | समादेशक, रारापोबल गट क्र.१२ हिंगोली | समादेशक, रारापोबल गट क्र.१२ हिंगोली | १० | ७००००० |
| ९ | समादेशक, रारापोबल गट क्र.१ पुणे | समादेशक, रारापोबल गट क्र.१ पुणे | १ | ७०००० |
| १० | पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण | पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण | ४ | २८०००० |
| ११ | पोलीस अधीक्षक, गडचिरोली | पोलीस अधीक्षक, गडचिरोली | १ | ७०००० |
| १२ | पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण | पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण | १ | ७०००० |
| १३ | पोलीस अधीक्षक, हिंगोली | पोलीस अधीक्षक, हिंगोली | १ | ७०००० |
| १४ | पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर | पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर | ८ | ५६०००० |
| १५ | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना | १ | ७०००० |
| १६ | समादेशक, रारापोबल गट क्र.९ अमरावती | समादेशक, रारापोबल गट क्र.९ अमरावती | ३ | २१०००० |
| १७ | विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परि. | विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परि. | १ | ७०००० |
| १८ | समादेशक, रारापोबल गट क्र.८ मुंबई | समादेशक, रारापोबल गट क्र.८ मुंबई | १ | ७०००० |
| १९ | पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई | पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई | १ | ७०००० |
| २० | पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर | पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर | २ | १४०००० |
| २१ | वि.पो.म., नक्षल विरोधी अभियान, नागपूर | वि.पो.म., नक्षल विरोधी अभियान, नागपूर | १ | ७०००० |
| २२ | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग औरंगाबाद | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग औरंगाबाद | ८ | ५६०००० |
| २३ | पोलीस आयुक्त, नागपूर | पोलीस आयुक्त, नागपूर | २ | १४०००० |
| | | एकूण | ९० | ६३,००,०००/- |